महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 28 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 270 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# मुंबईत सर्वाधिक कुपोषित मुलांची नोंद !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्याची कुपोषणमुक्तीकडे वाटचाल होत असल्याचा दावा विविध यंत्रणांकडून केला जात असला, तरी फेब्रुवारीमध्ये राज्यात एक लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके असल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे. त्यातील ३० हजार ८०० बालके गंभीर तीव्र कुपोषण (सॅम) श्रेणीत, तर एक लाख ५१ हजार ६४३ बालके मध्यम (मॅम) कुपोषित श्रेणीत आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक, १६ हजार ३४४ कुपोषित बालकांची नोंद झाली आहे. राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून कुपोषण तसेच बालमृत्यूंची समस्या कायम आहे. कुपोषणमुक्तीसाठी प्रयत्न करताना आहार, आरोग्य, पोषण अशा वैद्यकीय कारणांसह सामाजिक कारणांचाही विचार करणे गरजेचे असते. मात्र ते प्रयत्न अपुरे असल्याचे या आकड्यांवरून दिसून येते. ही समस्या सोडवण्यासाठी समग्र प्रयत्नांची गरज असून, त्यासाठी राज्यातील कुपोषण व बालमृत्यूंची आकडेवारी एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत जाहीर करणे आवश्यक आहे. मात्र, एप्रिल २०२४पासून ही माहिती देण्यात आली नसल्याचे 'महाराष्ट्र टाइम्स'ने बातमीद्वारे निदर्शनास आणून दिल्यानंतर, यंत्रणेला खडबडून जाग आली आहे. यंत्रणेने कुपोषणाबाबतची माहिती उपलब्ध केली आहे. राज्यामध्ये एक लाख ८२ हजार ४४३ बालके कुपोषित असल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे.

नोंदवण्यात आलेल्या एकूण ४८ लाख ५९ हजार ३४६ बालकांपैकी फेब्रुवारी २०२५मध्ये ४७ लाख ९८ हजार १३८ बालकांचे वजन करण्यात आली, तर ६१ हजार २२७ बालकांचे वजन करण्यात आले नाही. या प्रक्रियेमध्ये नियमितता नसेल, तर राज्यातील कुपोषणाचे प्रमाण नेमके कसे समजणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

अहवालामध्ये ४७ लाख ९८ हजार १३९ बालकांचे वजन घेतल्याची नोंद असली, तरी प्रत्यक्षात ४७ लाख ९२ हजार ४७ बालकांच्या पोषणश्रेणीची नोंद करण्यात आली आहे. उर्वरित सहा हजार ९२ बालकांच्या पोषणश्रेणीची नोंदच नाही. त्यामुळे शंकेला वाव आहे. महापालिका प्रशासनाने मुंबई उपनगरामध्ये कुपोषित मुलांची संख्या सर्वाधिक असण्यामागे लोकसंख्या, स्थलांतरितांचा भार ही कारणे दिली आहेत. अंगणवाडी केंद्रांमधील बालकांची दरमहा वजन-उंची नोंदवून त्यांची केंद्र शासनाच्या 'पोषण ट्रॅक्टर' या अॅप्लीकेशनमध्ये नोंद करण्यात येते. फेब्रुवारी महिन्यामध्ये अतितीव्र कुपोषित बालकांचे राज्यातील प्रमाण ०.६४ टक्के इतके असून आदिवासी क्षेत्रामध्ये हे प्रमाण ०.६१ टक्के नोंदवण्यात आल्याची माहिती महिला व बालविकास विभागाने दिली आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेतर्गत माहितीमध्ये ग्रामीण आणि आदिवासी भागातील कुपोषित मुलांची नोंद नाही.

**मुंबई उपनगर जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १६ हजार ३४४ कुपोषित बालकांची नोंद**

**राज्यात १.८२ लाख मुले कुपोषित**




**थोडक्यात महत्वाचे**

## निकृष्ट कामामुळे कंत्रादारांना ३.३७ कोटींचा दंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. २७** पालिकेने मुंबईत रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत. तब्बल १,०८४ रस्त्यांची कामे एकाचवेळी सुरू केल्याने मुंबईत वाहतुकीचे तीन तेरा झाले आहेत. या कामांमुळे धूळ प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. शिवाय काम सुरू असताना रस्ते बंद केले जात असल्याने वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेक ठिकाणी कंत्राटदारांनी निकृष्ट काम केल्यामुळे तब्बल ३.३७ कोटींचा दंड ठोठावण्यात आला आहे.

पालिकेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात फेज-१मध्ये ७०० रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. तर फेज-२ मध्ये १,४२१ कामे हाती घेण्यात आली आहेत. अनेक ठिकाणी प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले जात नसल्याचे समोर आले आहे. तसेच दिवस-रात्र काम सुरू असल्यामुळे नागरिक मशीन्सच्या आवाजामुळे त्रस्त आहेत.






## कचऱ्याच्या मुद्द्यावरून अंबरनाथ बदलापूर नगरपालिकांमध्ये विवाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. २७ (बातमीदार) :** वडवली परिसरात असलेल्या डम्पिंग क्षेत्राकडे जाणाऱ्या रोडवर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत शेजारील अंबरनाथ नगरपालिकेचा कचरा टाकला जात आहे, असा आरोप परिसरातील ग्रामस्थांनी केला आहे. तसेच कचऱ्यामुळे परिसरातील रहिवासी क्षेत्रावर याचा गंभीर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. बदलापूर पश्चिमेकडील वडवली, नवीन अंबरनाथ क्षेत्रातील मध्यवर्ती भाग हा कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीत येतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत बदलापूर पालिकेकडून वृक्षारोपण करण्यात आले होते.

मात्र काही दिवसांपूर्वी या ठिकाणी असलेली झाडे तोडून माती उकरण्यात आली आहे. मध्यरात्रीच्या वेळेत जेसीबीच्या साह्याने कचरा, प्लॅस्टिक या ठिकाणी सर्रासपणे टाकले जात आहे. ही बाब समजू नये म्हणून त्यावर माती टाकण्यात येते, अशी तक्रार नवीन अंबरनाथ येथील ग्रामस्थांनी केली आहे. इतकेच काय तर रात्री दोन वाजल्यानंतर हा प्रकार घडत आहे. शेजारील अंबरनाथ पालिकेतूनच येणारा हा कचरा आहे.

रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन हा कचरा या ठिकाणी टाकण्यात येत असल्याचा आरोप या ग्रामस्थांनी केला आहे. ही जागा कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील असून, गेल्या काही दिवसांपासून घडत असलेल्या या प्रकाराबाबत बदलापूर व अंबरनाथ पालिकेने लक्ष देणे गरजेचे असल्याचे येथील ग्रामस्थांनी म्हटले आहे.

> कुळगांव बदलापूर नगरपालिकेच्या हद्दीतील वडवली व नवीन अंबरनाथ या क्षेत्रातील मध्यवर्ती जागेच्या २०० ते ३०० मीटर अंतरावर अंबरनाथ नगरपालिकेचे डम्पिंग आहे. अंबरनाथ पालिका त्या ठिकाणी कचरा न टाकता बदलापूर हद्दीतील या जागेत कचरा टाकत आहे. यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. परिणामी डासांचे प्रमाण वाढले आहे. अंबरनाथ पालिकेने याबाबत सखोल चौकशी करावी.
> अमोल भोईर, ग्रामस्थ

> कोणत्याही प्रकारचा कचरा टाकला जात नाही. यापूर्वी याच संदर्भात आमच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची पूर्ण सखोल चौकशी आम्ही केली आहे. असा कोणताही प्रकार अंबरनाथ पालिकेने केलेला नाही. - उमाकांत गायकवाड, मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपालिका

## क्लीन-अप मार्शल योजना कायमची बंद


### लाचखोरीच्या वाढत्या तक्रारींमुळे पालिकेचा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

लाचखोरीच्या तक्रारींमुळे मुंबईतील क्लीन-अप मार्शलची योजना कायम स्वरुपी बंद करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या प्रस्तावाला आता आयुक्त भूषण गगराणी यांनीही दुजोरा दिला आहे. मुंबईत येत्या ४ एप्रिलपासून क्लीन-अप मार्शल सेवा पूर्णपणे बंद होणार असल्याची माहिती आहे. मार्शलकडून नागरिकांना धमकावले जाते, हप्ते घेतले जातात, लाच घेतली जाते, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर येऊ लागल्याने योजना गुंडाळण्याच्या निष्कर्षाप्रत प्रशासन आले आहे. नागरिकांसह पालिकेच्या अनेक विभाग अधिकाऱ्यांनीच मार्शलमुळे उपद्रव होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. लाचखोरीच्या आरोपांमुळे काही दिवसांपूर्वीच पालिकेच्या पाच रुग्णालयांमधून मार्शलची हकालपट्टी करण्यात आली होती. रुग्णालयात नागरिक, रुग्णांच्या नातेवाईकांनी अस्वच्छता करू नये, यासाठी त्यांची नियुक्ती झाली होती. परंतु, तेथेही ते रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैसे मागत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आल्या होत्या. पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अशलाचखोरीच्या तक्रारींमुळे मुंबईतील



क्लीन-अप मार्शलची योजना कायम स्वरुपी बंद करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या प्रस्तावाला आता आयुक्त भूषण गगराणी यांनीही दुजोरा दिला आहे. मुंबईत येत्या ४ एप्रिलपासून क्लीन-अप मार्शल सेवा पूर्णपणे बंद होणार असल्याची माहिती आहे. मार्शलकडून नागरिकांना धमकावले जाते, हप्ते घेतले जातात, लाच घेतली जाते, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर येऊ लागल्याने योजना गुंडाळण्याच्या निष्कर्षाप्रत प्रशासन आले आहे. नागरिकांसह पालिकेच्या अनेक विभाग अधिकाऱ्यांनीच मार्शलमुळे उपद्रव होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. लाचखोरीच्या आरोपांमुळे काही दिवसांपूर्वीच पालिकेच्या पाच रुग्णालयांमधून मार्शलची हकालपट्टी करण्यात आली होती. रुग्णालयात नागरिक, रुग्णांच्या नातेवाईकांनी अस्वच्छता करू नये, यासाठी त्यांची नियुक्ती झाली होती. परंतु, तेथेही ते रुग्णांच्या नातेवाईकांकडून पैसे मागत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आल्या होत्या. पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी मध्यंतरी या योजनेचा आढावा घेतला होता. मार्शल पुरवणाऱ्या काही संस्थांनी हेराफेरी केल्याचेही आढळून आले होते. निर्धारित संख्येपेक्षा कमी संख्येने मार्शल पुरवल्याची बाब उघड झाल्यानंतर काही संस्थांना सुमारे ६३ लाखांचा दंडही ठोठावला होता.्विनी जोशी यांनी मध्यंतरी या योजनेचा आढावा घेतला होता. मार्शल पुरवणाऱ्या काही संस्थांनी हेराफेरी केल्याचेही आढळून आले होते. निर्धारित संख्येपेक्षा कमी संख्येने मार्शल पुरवल्याची बाब उघड झाल्यानंतर काही संस्थांना सुमारे ६३ लाखांचा दंडही ठोठावला होता.



## लोखंडी रॉड लागल्यानं गिरीश महाजन यांना दुखापत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नाशिक :** देशसेवा बजावत असताना वीरमरण आलेल्या वरणगाव येथील अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिवाचे दर्शन घेताना मंत्री गिरीश महाजन यांच्या डोक्याला लोखंडी रॉड लागल्याने दुखापत झाली आहे. या दुखापतीनंतर जखमी अवस्थेतच मंत्री महोदयांना वरणगाव येथील निमजाय हॉस्पिटल येथे नेण्यात आले, तेथे त्यांनी प्राथमिक उपचार घेतल्यानंतर ते वीर जवान अर्जुन बाविस्कर यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. त्यानंतर, महत्त्वाची बैठक असल्याने ते पुढे नाशिककडे रवाना झाले आहेत. दरम्यान, मंत्री महोदयांच्या डोक्याला इजा झाल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांची काहीवेळ धांदल उडाली होती.

वरणगाव येथील वीरगती प्राप्त झालेले जवान अर्जुन लक्ष्मण बाविस्कर यांना मानवंदना देण्यासाठी जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन आज वरणगाव शहरात आले होते. वीर जवान अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी मिल्ट्रीच्या ट्रॅकमध्ये चढले असताना ट्रॅकचा वरचा लोखंडी रॉड त्यांच्या डोक्याला लागला. त्यानंतर, डोक्यातून रक्तस्राव होत असतानाही गिरीश महाजन यांनी वीर जवान अर्जुन बाविस्कर यांच्या पार्थिव देहाला पुष्पचक्र अर्पण करत अभिवादन केले. मात्र, डोक्याचे रक्त थांबत नसल्याने उपस्थित माजी नगराध्यक्ष सुनील काळे, कामगार नेते मिलिंद मेढे, भाजपा शहराध्यक्ष सुनील माळी, शेख आखलाक यांनी आग्रह करुन प्राथमिक उपचारासाठी त्यांना तातडीने जवळील हॉस्पिटलमध्ये नेले. रुग्णालयात डॉ. निलेश पाटील यांनी त्यांच्यावर उपचार केले. त्यानंतर, गिरीश महाजन यांनी वीर जवान अर्जुन बाविस्कर यांच्या परिवाराला भेट देत सांत्वन केले. तसेच, काळजी करू नका देशसेवा करीत असतांना अर्जुनला वीरमरण आले याचे दुःख आमच्या मनात आहे. मात्र, मी व राज्य सरकार बाविस्कर परिवाराच्या दुःखात सहभागी आहे, असे अभिवचन महाजन यांनी दिले. दरम्यान, गिरीश महाजन यांच्या डोक्याला मार लागला असतांना सुद्धा पुढे अंत्ययात्रेत तिरंगा सर्कल पर्यंत ते चालत गेले, तिथे हजारो वरणगावकरांच्या उपस्थित मानवंदना दिली, त्यानंतर नाशिक येथे महत्वाची बैठक असल्याने मला जावे लागणार आहे, असे सांगून त्याच स्थितीत मंत्री गिरीश महाजन तातडीने वाहनाने नाशिककडे रवाना झाले.






# धरणांचा शहापूर तालुका पाण्याविना तहानलेला



| शहापूर तालुक्यातील जलजीवन कामे ठप्प | लाडक्या बहिणींच्या डोक्यावरील हंडा उतरेना |
|---|---|
| विहिरी आटल्या बोअरवेलने तळ गाठला | ७१ गाव-पाड्यांवर २९ टँकरने पाणीपुरवठा |



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** तालुक्यातील ग्रामीण भागात भूगर्भातील पाणी पातळी खालावली असल्याने बोअरवेल व विहीरीतील जलस्रोत आटल्याने दरवर्षी प्रमाणे भिषण पाणी टंचाई सुरू झाली आहे. तर येथील विहीर तसेच बोअरवेलच्या झऱ्यातून पाणी जमा होईपर्यंत महिलांना एक/दोन तास ताटकळत पाण्याची वाट पहावी लागत आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणारी तानसा, वैतरणा, भातसा, मध्यवैतरणा ही जलाशय शहापुरात असतांना देखील याठिकाणी भिषण पाणी टंचाई जानवत असुन धरण उशाला, कोरड घशाला अशी गंभीर परिस्थिती येथील नागरिकांची झाली आहे.

. तालुक्यात जलस्वराज्य, भारत निर्माण व राष्ट्रीय पेयजल यासारख्या दोनशे योजना केवळ कागदावरच पूर्ण झाल्या असून सातत्याने या योजनेतून पाणीपुरवठा होत नाही त्यामुळे सद्यस्थितीतील जल जिवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू करून अर्धवट अवस्थेत बंद आहेत. योजनांची कामाची मुदत सन २०२३ मध्ये संपुष्टात आली असतांना देखील काही ठिकाणी ही कामे अतिशय धिम्यागतीने तर काही ठिकाणी बंद अवस्थेत आहेत.मात्र सर्व योजनांची कामे ही वनपरवानग्या, जागा निश्चित नसल्याने तसेच अपुरे कामांमुळे बारगळल्या आहेत.

तालुक्यातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही काही योजनेचे काम अर्धवट अवस्थेत ठप्प झाले असल्याने जलजीवन योजनेच्या'हर घर जल'योजनेलाच घरघर लागली असल्याने ही योजनाच पूर्ण होत नसल्याने ठिकठिकाणी स्थानिक रहिवाशांना तिव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने महिलावर्ग संताप व्यक्त करीत आहेत.बिल मिळत नसल्याने अंतिम टप्प्यात आलेल्या योजना पूर्ण करण्यास ठेकेदार टाळाटाळ करीत असून अधिकारी वर्गाही हताश झाला आहे. ज्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी जलजीवन योजनेची कामे घेतली आहेत त्यांची कामासाठी उसने पैसे घेतल्याने व दागिने गहाण ठेऊन कामे केल्याने आर्थिक कोंडी झाल्याने ते हवालदिल झाले असून शासनाने कामाचे बिल लवकरात लवकर अदा करावे यासाठी पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारून हैराण झाले आहेत. दरम्यान भावली पाणीपुरवठा योजनेवर जलजीवन मिशनच्या 119 योजना मंजूर असून त्यापैकी 21 पूर्ण झाल्या आहेत तर 93 योजनाचे काम प्रगतीपथावर असून 5 योजना अजून तात्रिक अडचणीमुळे बंद आहेत.

**उपाययोजना ठरतात फेल**

पाणीटंचाईची समस्या सोडविण्यासाठी गाव-पाड्यांत सरकारी पातळीवरून विविध उपाययोजना करुन देखील दरवर्षी अनेक गाव-पाड्यांत टंचाई जाणवते. या निर्माण होणाऱ्या टंचाईच्या समस्येसाठी सरकारी पातळीवर विविध उपाययोजना आखून पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. २०२४-२५ या वर्षासाठी संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा तयार करून प्रस्तावित केला.यंदा तालुक्यात जानेवारी ते जून दरम्यान ३०६ गावे व ५६३ पाडे, असे एकूण ८६९ गाव-पाड्यांत टंचाई जाणवत आहे. परंतु सद्या २४ गावे व ११६ पाडे यासाठी एकूण ३३ टँकरची गरज असून यासाठी पाणीपुरवठा विभागाकडून १६ गावे व ७१ पाड्यांना २९ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे शाखा अभियंता के.आर.गायकवाड यांनी सागितले.

### व्यथा ठेकेदारांच्या

गेल्या तीन वर्षांपासून जलजीवनचे तीन कामे पूर्ण केली व त्या कामात अडीच कोटी रुपयांचे बिल आजतागायत मला न मिळाल्याने घरातील चरितार्थ चालविण्यासाठी घरातील महिलांचे दागिने ठेऊन उदरनिर्वाह करत आहे तसेच सुशिक्षित बेरोजगारांनी या कामात पैसे मिळतील म्हणून घरातील दागदागिने ठेऊन,उधारीवर साहित्य घेऊन काम केले पण त्यांनाही एकही हप्ता न मिळाल्याने ते हैराण झाले असून नैराश्याच्या छायेत आहेत व शहापूर तालुक्याला आलेला ६८ कोटींचा निधी निवडणुकी दरम्यान लाडकी बहीण योजनेकडे वर्ग केल्याने त्यात अजून अडचण निर्माण झाली असून ठेकेदारांची परिस्थिती हलाखीची झाल्याने शासनाने जलजीवन मिशनच्या कामाचे बिल प्राधान्याने द्यावे यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या वतीने आम्ही ५ फेब्रुवारी २०२५ पासून काम बंद केले असल्याचे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे तालुकाध्यक्ष अनिकेत धलपे यांनी सागितले.

## गीतासार



### अध्याय ६
### आत्मसंयमयोगः

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः । शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ६-७ ॥

थंड-उष्ण, सुख-दुःख इत्यादी तसेच मान-अपमान यांमध्ये ज्याच्या अंतःकरणाची वृत्ती पूर्णपणे शांत असते, अशा स्वाधीन आत्मा असलेल्या पुरुषाच्या ज्ञानात सच्चिदानंदघन परमात्मा उत्तमप्रकारे अधिष्ठित असतो; म्हणजेच त्याच्या ज्ञानात परमात्म्याशिवाय दुसरे काही नसतेच. ॥ ६-७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः । युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः ॥ ६-८ ॥

ज्याचे अंतःकरण ज्ञान-विज्ञानाने तृप्त आहे, ज्याची स्थिती निर्विकार आहे, ज्याने इंद्रिये पूर्णपणे जिंकली आहेत आणि ज्याला दगड, माती व सोने समान आहे, तो योगी युक्त म्हणजे भगवंताला प्राप्त झालेला आहे, असे म्हटले जाते. ॥ ६-८ ॥

सुहृन्मित्रार्युदासीन मध्यस्थ द्वेष्यबन्धुषु । साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ६-९ ॥

सुहृद, मित्र, शत्रू, उदासीन, मध्यस्थ, द्वेष करण्याजोगा, बांधव, सज्जन आणि पापी या सर्वांविषयी समान भाव ठेवणारा अत्यंत श्रेष्ठ आहे. ॥ ६-९ ॥

## रेसिपी
### कच्च्या कैरीची आमटी



**साहित्य**

तूर डाळ - अर्धी वाटी,मध्यम कच्ची कैरी - 1,साजूक तूप - 2 ते 3 चमचे,धणे - 2 ते 3 चमचे,कढीपत्ता - 15 ते 20 पाने,हिरव्या मिरच्या - 2,मोहरी - पाव चमचा,जिरे - पाव चमचा, हिंग - चिमूटभर, लाल तिखट - 1 चमचा, हळद - पाव चमचा,धणे पावडर - 1 चमचा, मीठ - 1 चमचा

**कृती**

डाळ धुवून 30 मिनिटे पाण्यात भिजवा.

आता कुकरमध्ये डाळ, मीठ, हळद घाला आणि गॅसवर ठेवा.

कुकरच्या दोन शिट्ट्या झाल्यावर गॅस बंद करा आणि प्रेशर जाऊ द्या.

आता कैरी धुवा, सोलून घ्या, त्याचा गर काढा आणि त्याचे लहान तुकडे करा.

एका कढईत तूप गरम करून त्यात जिरे, मोहरी, कच्च्या कैरीचे तुकडे घालून परतून घ्या.

हे भाजले की त्यात हळद, धणे, हिंग, कढीपत्ता इत्यादी घाला आणि परतून घ्या.

झाकण ठेवून ३-४ मिनिटे शिजवा.

यानंतर शिजलेली डाळ घाला आणि एक उकळी येऊ द्या.

अशाप्रकारे कच्च्या कैरीची डाळ तयार आहे. गरमागरम भातासोबत सर्व्ह करा.

# कल्याण शीळ रोडवरील वाहतूक कोंडीचा विद्यार्थ्यांना फटका

## वाहतुक कोंडीत बसेस अडकल्याने शाळेला दिली सुट्टी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण - शीळ रोडवर सकाळ पासूनच वाहतूक कोंडी झाल्याने याचा फटका नागरिकांना सोबतच विद्यार्थ्यांनाही बसला आहे. विद्यार्थ्यांना सकाळी जाण्यासाठी तब्बल दोन तास लागेल, त्यामुळे दुपारी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना सुट्टी दयावी लागली. ऐन परीक्षेच्या तोंडावर शाळा बुडत असल्याने पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



वाहतूक कोंडीमुळे कल्याण, डोंबिवलीकर नागरिक हैराण झाले असतांना याच विषयावरून सत्ताधारी प्रशासनावर समाज माध्यमातून टीका केली जात आहे. यातच आता मनसेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील 'नाथ' किती वर्ष आश्वासन देतो, विकासाचे रोज रोज तेच भाषण देतो !..... अशी एक्स पोस्ट करत ही परिस्थिती लवकर सुधारली नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा दिला आहे. त्यामुळे आता तरी प्रशासन लक्ष देणार का हे पहावे लागले.

कल्याण तळोजा मेट्रो ना येथील नागरिकांच्या फायद्यासाठी आहे ना या परिसरातील विद्यार्थ्यांच्या. ही मेट्रो फक्त आणि फक्त बिल्डरांच्या फायद्यासाठी व या प्रकल्पातून मिळणाऱ्या टक्केवारीसाठी येथे आणली आहे. एकीकडे कल्याण-शीळ रस्त्याच्या तिसऱ्या मार्गीकेचे भूसंपादन झाले नाही, दुसरीकडे ठेकेदारांना द्यायला पैसे नाहीत म्हणून पलावा पुल रखडला आहे. तरीही या प्रकल्पाचेही पुर्ण भूसंपादन झाले नसताना लोकसभेच्या तोंडावर लोकांना खोटा विकास दाखविण्यासाठी काम सुरू करण्यात आले.

या 'बिल्डरांच्या मेट्रोसाठी' विद्यार्थी, पेशंट, नोकरदार वर्ग व सर्वसामान्य नागरिकांना वेठीस ठेवण्याचे काम सुरू आहे. आज या कामांमुळे होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीमूळे काही शांळाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या याचे कोणालाच सोयरसुतक नाही ? आमचे पालकमंत्री तर फक्त बालकाच्या कार्यक्रमाला सायरन वाजवत येतात, इतर वेळी त्यांनाही काही पडली नाही. खरंतर या अनागोंदीला त्यांचाच इतक्या वर्षातला विकासाच्या नावाने चाललेला हा गोंधळ कारणीभूत आहे. ही परिस्थिती लवकर सुधारली नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा राजू पाटील यांनी दिला आहे.

# भेसळखोरांना रोखा



पनीर पासून तयार करण्यात आलेले डिशेस सर्वचजण चवीने खातात. लहान मुलांना तर पनीर खूपच आवडते. मात्र ह्याच सर्वांच्या आवडत्या पनीर मध्ये भेसळ होत असल्याची आणि राज्यभरात विकले जाणारे पनीर बनावट असल्याचा मुद्दा श्रीगोंद्याचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विधानसभेत मांडला. राज्यात विकले जाणारे पनीर बनावट असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होतीच आमदार साहेबांनी त्यावर शिक्कमोर्तब केले. बनावट पनीर तयार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी केली. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणल्याबद्दल आमदार पाचपुते साहेब तसेच भेसळ खोरांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब यांचे मनापासून आभार! बनावट पनीर तयार करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या महाभागांना शिक्षा झाली पाहिजेच पण केवळ बनावट पनीर तयार करणारेच नव्हे तर सर्व भेसळखोरांवर कारवाई झाली पाहिजे. राज्यात भेसळ खोरांनी उच्छाद मांडला आहे .

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

राज्यात दूध भेसळीचे प्रकार वाढत आहे. एक लिटर दुधात काही रासायनिक पदार्थ टाकून वीस लिटर दुध बनवण्याचे प्रकार सुरू आहे. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यातच दूध भेसळीचे रॅकेट उघडकीस आले होते . दौंडमध्येही म्हशींनी अधिक दूध द्यावे यासाठी त्यांना प्रतिबंधक इंजेक्शन दिले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केवळ दुधातच नव्हे तर मिठाईमध्येही भेसळ केली जात आहे. मिठाई बनवताना वापरण्यात येणाऱ्या खव्यामध्येही भेसळ असल्याच्या अनेक घटना राज्यात उघडकीस आल्या आहेत. बर्फी किंवा खवा दुधापासूनच बनतो अशी सर्वसामान्यांची धारणा असते. फराळाचे पदार्थ बनवण्यासाठी त्याचा उपयोग केला जातो. लहान मुलांना हे खव्यापासून तयार केलेले पदार्थ खूप आवडतात. त्याला मागणीही जास्त असते त्यामुळेच वर्षानुवर्षे पडलेली दुधाची पावडर, स्टार्च, वनस्पती तूप, दूध याबरोबरच काही प्रमाणात रसायन मिसळून तयार केलेला निकृष्ट खवा भेसळखोर बाजारात खवपीत आहेत. काही भेसळखोर दर्जेदार खाद्यान्नाच्या ब्रॅण्डसशी साम्य असणारे बनावट, कमअस्सल तब्येतीला घातक पदार्थ सारख्याच दिसणाऱ्या वेष्टनातून विकत आहेत. हे पदार्थ शहरातील प्रश्नार्थक वातावरणात बनवले जातात. हे पदार्थ रस्त्यांवर कुत्री मांजरी फिरण्याच्या ठिकाणी वाळत घातलेले दिसतात. भेसळखोरांमुळे ग्राहकांचे आरोग्यच धोक्यात आले आहे. दुध, मिठाई आणि खाद्यपदार्थांत भेसळ होत असल्याने ग्राहकांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. भेसळयुक्त दुधामुळे ग्राहकांचे हृदय, किडनी व यकृत निकामी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुधातील भेसळीमुळे शरीर वाढीसाठी आवश्यक असणारे लायसीन हे अमिनो आम्ल शरीरास उपलब्ध होत नाही परिणामी लहान मुलांच्या शरीर वाढीवर परिणाम होऊन शरीराची वाढ खुंटते शिवाय उच्च रक्तदाब व हृदय विकारासारखे आजार जडतात. भेसळयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने आगामी वीस वर्षांत देशातील तीस ते चाळीस टक्के लोकांना कर्करोग होऊ शकतो असा इशाराच जागतिक आरोग्य संघटनेने दिला आहे. हे एक प्रकारचे स्लो पॉईजन आहे. हे स्लो पॉईजन देऊन ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणारे मोठे रॅकेट राज्यभरात कार्यरत आहे. या रॅकेटचा आणि त्यात सहभागी असलेल्या समाज कंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. ही भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची अर्थात एफ डी ए ची आहे. ते त्यांची जबाबदारी पार पाडतही आहे त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या नवी मुंबई परिमंडळ २ ला अलीकडेच नवी दिल्लीच्या ईट राईट इंडियाच्या उपक्रमात सहभागी होऊन २०२२ - २३ साठीचे पाच लाखांचे पारितोषिक अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचकडून प्राप्त झाले आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच मात्र एफ डी आयच्या कारवाईत सातत्य नाही. कारवाईत सातत्य नसल्यानेच भेसळखोरांना त्यांची भीती वाटेनाशी झाली आहे. एफ डी आय चा वचक नसल्यानेच राज्यात भेसळखोरी वाढली आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. दूध आणि खाद्य पदार्थातील भेसळखोरी रोखण्यासाठी पोलीस आणि एफ डी ए ने एकत्र येऊन राज्यभरात धडक मोहीम राबवायला हवी. कमी श्रमात अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या भेसळखोरांना थेट फाशीचीच शिक्षा द्यायला हवी.

# महिलेला अपमानास्पद वागणूक देणारा गुन्हेगार मोकाट

## पोलीस कारवाई कधी करणार?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणेशनगर भानवज रोड, वर्धमान नगर, खोपोली ता खालापुर जि रायगड येथे राहणारी ४६ वर्षीय महिला कुटुंबासमवेत राहत असून खाली प्लॅट आहे त्या प्लॅटमध्ये लादीचे व स्टाईलचे काम चालु होते ते बघण्यासाठी गेली असता शेजारच्या घरातील मिलींद चौधरी तेथे आला व मला बोलला की तुमचे गटाराचे पाणी येते यावर मी बोलले की गटाराचे पाणी येत नाही असं बोलल्यावर सदर इसम मला शिव्या द्यायला लागला व माझे अंगावर खुर्ची मारायला घेतली व माझे गाऊनला हात धरुन मला खाली ओढली व शिव्या दिल्या व धक्काबुक्की केली मला व माझ्या नव-याला यांच्यापासुन धोका आहे . तू निच आहेस ये तु चल माझे सोबत असे मला बोलला तसेच माझ्या अंगावरुन घाण घाण शिव्याही दिल्या. यांच्यापासुन माझ्या कुंदुबांला भिती आहे आमचा एकट्याचा परिवार आसल्याने मला हे भरपुर त्रास देतात तसेच माझ्या अंगावर दगड फेकला व मी बाजुला झाले म्हणून मी वाचली नाहीतर माझ्या डोक्याला लागला आसता मला व माझ्या नव-याला त्याच्यापासुन खुप भिती वाटते व माझी छेडछाड केली असल्याने माझी मिंलीद चौधरी यांचेविरुध्द तक्रार सदर महिलेने केली आहे.खोपोली पोलिस ठाण्यात ८फेब्रुवारी२०२५ रोजी तक्रार दिली असून सदर इसमा विरोधात भारतीय दंड संहिता नुसार कलम ७४, १२५ ,३५२, ११५(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे मात्र एक ते दिड महिना होऊन देखील सदरचे प्रकरण खोपोली पोलिस यांनी न्यायालयात दाखल केलेले नाही. यामुळे सदर महिलेला न्याय मिळणार की नाही असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

**सदर महिलेला केलेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक करून जास्तीत जास्त कडक कारवाई करावी अशी मागणी महिलेच्या नातेवाईकांनी केली आहे.**

**याबाबत खोपोली पोलिस निरीक्षक शितल राऊत यांच्याशी आमच्या प्रतिनिधी यांनी संपर्क केला असता सदर केसचा तपास चालू आहे न्यायालयात केस दाखल करण्यासाठी ६०दिवसाचा कालावधी लागतो असे सांगून लवकरच केस दाखल करू असेही सांगितले.**

## सण उत्सवांच्या निमित्त
# कल्याणमध्ये पोलिसांचे रुट मार्च



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आगामी गुढी पाडवा, रमजान ईद, रामनवमी, हनुमान जयंती आदी सण उत्सवाच्या अनुषंगाने कल्याण परिमंडल 3 अंतर्गत कल्याणमध्ये रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

हा रूट मार्च महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन हद्दीतील सदानंद चौक काळी मशीद या ठिकाणावर सुरू होऊन पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दीत प्रवेश करून पुढे केडीएमसी मुख्यालय- शंकरराव चौक - आचार्य अत्रे नाट्यगृह - घेला देवजी चौक- गांधी चौक- दूध नाका - पारनाका - लालचौकी- दुर्गामाता चौक - दुर्गाडी मंदिर- वाय जंक्शन येथे यु टर्न घेऊन दुर्गाडी मंदिर या ठिकाणी पोहोचून रूट मार्च समाप्त झाला.

या रुट मार्च करिता पोलीस उप.आयुक्त अतुल झेंडे. सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, यांच्या सह महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, खडकपाडा पोलीस स्टेशन व बाजारपेठ पोलीस स्टेशनचे 5 पोनि, 10 सपोनि पोउपनि व 77 अंमलदार तसेच एसआरपीएफचे 1 अधिकारी 11 अंमलदार, 3 पिटर मोबाईल, 1 सीआरएम मोबाईल, वरून मोबाईल सह सहभागी झाले होते.

# ६५ महारेरा बेकायदा इमारतीमधील रहिवाशांना मुख्यमंत्र्यांचा दिलासा

## प्रदेश भाजप कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवलीतील 65 महारेरा बेकायदा इमारतीतील रहिवाशांना कोणत्याही प्रकारे बेघर होऊ देणार नाही. त्यांचे संरक्षण करण्यास शासन समर्थ आहे, असा दिलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधिमंडळ अधिवेशनात डोंबिवलीतील बेकायदा बांधकामाच्या विषयावर सुरू असलेल्या चर्चेला उत्तर देताना दिला. पालिका अधिकाऱ्यांच्या संरक्षणांमुळे या बेकायदा इमारती उभ्या राहतात. या बांधकामांना पाठबळ देणारे अधिकारी नंतर निवृत्त होऊन जातात. पण अशा मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण क्षेत्रातील पालिकांमधील बेकायदा इमारतींना पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांना यापुढे कठोर शासन करून त्यांना



तुरुंगाची हवा चाखावी लागेल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिला. सरकारी जमिनी बनावट कागदपत्रांच्या आधारे भूमाफिया आपल्या नावावर करतात. त्या आधारे बनावट बांधकाम परवानग्या, अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या मारून बनावट कागदपत्र तयार करतात. या कागदपत्रांच्या आधारे महारेराची नोंदणी प्रमाणपत्र मिळवतात. आणि महारेराची नोंदणी प्रमाणपत्र बघून या इमारती अधिकृत आहेत असे समजून लोकांनी या बेकायदा इमारतीत घर घेतली आहेत. लोकांची या प्रकरणात कोणत्याही प्रकारची चूक नाही. त्यामुळे या बेकायदा इमारतीमधील रहिवाशांना शासन संरक्षण देईल. त्यांना बेघर होऊ देणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. डोंबिवलीतील 65 बेकायदा इमारतींमधील रहिवाशांवर न्यायालयाच्या आदेशावरून बेघर होण्याची वेळ आली, त्यावेळी डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी आपल्या मतदारसंघातील रहिवाशांवर बेघर होण्याची वेळ येणार नाही यासाठी आपण नक्की प्रयत्न करू असे आश्वासन रहिवाशांना दिले होते. आमदार चव्हाण यांनी या इमारतींमधील रहिवाशांना घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांची भेट घेतली होती. या रहिवाशांना दिलासा देण्याची मागणी केली होती. गेल्या आठवड्यात भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजप कार्यअध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर दूर दृश्य प्रणालीतून बैठक झाली होती. यावेळी चव्हाण यांनी कोणत्याही परिस्थितीत शासनाने डोंबिवलीतील बेकायदा इमारतींमधील रहिवाशांच्या पाठीशी शासनाने उभे राहावे अशी ठाम भूमिका घेतली होती. त्यांच्या या अथक प्रयत्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिलेल्या आश्वासनामुळे यश मिळाले आहे. मुख्यमंत्र्यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे विधिमंडळात सांगितले. कल्याण डोंबिवलीत एकूण 499 बांधकामे अनधिकृत घोषित आहेत. त्यामधील 58 भूमाफियांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. 84 बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहे अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनामुळे बेकायदा इमारतींची बनावट कागदपत्र तयार करणारे भूमाफिया आणि या बांधकामांना पाठबळ देणारे पालिका अधिकारी चांगले अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# साप्ताहिक कल्याण प्रजाराजच्या ३० व्या वर्धापन समारंभाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे, मुंबई, पालघर व रायगड जिल्ह्यातील गेल्या ३० वर्षा पासून नियमितपणे सुरू असलेले गुजराती साप्ताहिक कल्याण प्रजाराज १ एप्रिल२०२५ रोजी ३० वर्ष पुर्ण करुन ३१ वा वर्षात पदार्पण करीत आहे. ह्या निमित्ताने ३० व्या वर्धापन समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याचे कल्याण प्रजाराजचे संपादक रवि विष्णुकुमार चौधरी यांनी सांगितले आहे.

सी. एम. गांधी ओडीटोरीयम,के.सी. गांधी स्कूल, कल्याण पश्चिम येथे सायंकाळी ५:३० वाजता कार्यक्रम आयोजित केला असून ह्या समारंभाचे अध्यक्ष स्थानी भागवताचार्य पू. श्री.भूपेन्द्रभाई पंड्या, प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र चव्हाण, कार्याध्यक्ष भा.ज.पा. महाराष्ट्र प्रदेश, आमदार विश्वनाथ भोईर, आमदार सुलभा गायकवाड, आमदार राजेश मोरे, माजी आमदार जगन्नाथ शिंदे, कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त डॉ. ईन्दुराणी जाखड, व अपर पोलीस आयुक्त संजय जाधव आदींचा त्या मध्ये समावेश आहे.

या कार्यक्रमात व्यापारी अग्रणी प्रेमजी गाला (रेमंड), दिपक पोपट (श्रीजी सेवा फाउंडेशन), भुषण कारीया (मनोवी गृप), व केतन पटेल (ठाणे) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात कल्याणच्या प्रतिष्ठित व्यापारी यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# आई एकविरा यात्रेसाठी टोलमाफीची मागणी

## लाखो भाविकांची सोय करण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कार्ला गडावरील आई एकविरेची पालखी आणि तळी भरणे हा कोळी-आगरी समाजाचा सर्वांत मोठा श्रद्धेय सोहळा म्हणून ओळखला जातो. यंदाही ३ एप्रिल ते ६ एप्रिल या कालावधीत हा सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडणार असून, रायगड, कल्याण, भिवंडी, ठाणे, पालघर, शहापूर आणि मुंबईसह विविध भागांतून लाखो भाविक कार्ला गडावर दर्शनासाठी दाखल होणार आहेत.

प्रत्येक वर्षी या यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात भाविक प्रवास करत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात भाविकांना टोलमाफी मिळावी, अशी मागणी शिवसेना उपशहरप्रमुख (कल्याण) विजय देशेकर यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, तसेच एकविरा देवस्थान मंदिर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त तथा लोकसभा खासदार बाळयामामा म्हात्रे आणि कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

आई एकविरा देवी ही कोळी-आगरी समाजाच्या अस्मितेचे व श्रद्धेचे प्रतीक आहे. दरवर्षी लाखो भाविक या यात्रेत सहभागी होतात. गडावर जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते, त्यामुळे टोलमाफीचा निर्णय झाल्यास भाविकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच, यात्रेच्या कालावधीत भाविकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने योग्य ते नियोजन करावे, अशीही मागणी होत आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# भिवंडी मनपातील उपायुक्तांचा निरोप समारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत कार्यरत शासनाच्या अधिकारी श्रीमती प्रणाली घोंगे यांची शासनाने महाराष्ट्र नागरी प्रशासकीय सेवा वर्ग 1 च्या पदावर पदोन्नती केल्याने त्यांना दिनांक 24.03.2025 रोजी महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले.

श्रीमती प्रणाली घोंगे यांची महाराष्ट्र नागरी प्रशासकीय सेवा वर्ग 1 च्या पदावर पदोन्नती होऊन त्यांची नियुक्ती नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई येथे झाली. त्यानिमीत्ताने एका छोटेखानी कार्यक्रमामध्ये श्रीमती प्रणाली घोंगे यांना निरोप देऊन त्यांचे जागी नियुक्त झालेले नवनियुक्त उपायुक्त श्री. विक्रम दराडे यांचे स्वागत करण्यात आले.

श्री. दराडे हे महानगरपालिकेत येण्यापुर्वी खुल्दाबाद नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी पदावर कार्यरत होते. त्यांची पदोन्नतीने भिवंडी निजामपूर





शहर महानगरपालिकेत नियुक्ती करण्यात आली आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभाचे अध्यक्षपद मा. अतिरीक्त आयुक्त (1) श्री. देविदास पवार यांनी भुषविले. श्री. पवार यांनी श्रीमती घोंगे यांनी त्यांच्या कार्यकाळात त्यांना सोपविलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्याचे नमुद करुन त्यांना पुढील वाटीचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी मा. अतिरीक्त आयुक्त (2) श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (मुख्यालय) श्री. रोहिदास दोरकुळकर, उपायुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, उपायुक्त (शिक्षण) डॉ. अनुराधा बाबर, सहायक आयुक्त (निवडणूक) श्री. नितीन पाटील, सहायक आयुक्त (समाज कल्याण) श्री. मिलींद पळसुले, वाहन विभाग नियंत्रण अधिकारी श्री. शेखर चौधरी, वाहन विभाग प्रमुख श्री. प्रशांत संख्ये, समाज कल्याण विभाग प्रमुख श्री. नितेश चौधरी, वाचालनालय विभाग प्रमुख श्री. स्नेहल पुण्यार्थी व महानगरपालिकेचे अन्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. अशी माहीती पालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली

# शंभर दिवसीय कृती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सोळा हजार ९०३ घरकुलांचा भूमिपूजन सोहळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे दि. 26** - मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये 100 दिवसांचा कृती कार्यक्रम व महा आवास अभियान सन 2024-25 अंतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये घरकुलांना उद्दिष्टाप्रमाणे मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना पहिला हप्ता वितरीत करणे, सर्व घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करणे हे उपक्रम समाविष्ट आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार जिल्हयात सर्वत्र एकाच दिवशी 16 हजार 903 घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलाचे भूमिपूजनाचा कार्यक्रम गुरुवारी दि. 27 मार्च, 2025 रोजी सकाळी 10.00 रोजी सर्व ग्रामपंचायत मध्ये आयोजित करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण गृह निर्माण अभियंता, ग्रामपंचायत अधिकारी व स्थानिक लोक प्रतिनिधी यांच्या सहभागाने भूमीपूजन कार्यक्रम राबविण्याबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी सर्व गट विकास अधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच या भूमीपूजन कार्यक्रमांमध्ये सर्व लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत ठाणे जिल्ह्याकरीता 2024-25 करीता 18 हजार 231 (अंबरनाथ-919,भिवंडी-4 हजार 529,कल्याण-1 हजार 079,मुरबाड-5 हजार 897 व शहापूर-5 हजार 807) एवढे उद्दिष्ट प्राप्त असून आज अखेर 18 हजार 010 (अंबरनाथ-915,भिवंडी-4 हजार 437,कल्याण-1 हजार 070,मुरबाड-5 हजार 810 व शहापूर-5 हजार 778) एवढी मंजुरी देण्यात आलेली आहे. यापैकी 15 हजार 279 लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करणेत आलेला आहे. त्यापैकी 2 हजार 477 घरकुले बांधकाम सुरु झाले असून 12 हजार 802 घरकुले तातडीने सुरु करणे आवश्यक आहे.



प्रधानमंत्री जनजाती आदिवासी महान्याय अभियान (Pm Janman) अंतर्गत ठाणे जिल्हयातील 12 हजार 976 (अंबरनाथ-887,भिवंडी-4 हजार 060,कल्याण-969,मुरबाड-3 हजार 08 व शहापूर-4 हजार 052)लाभार्थी पात्र ठरले असून यापैकी 8 हजार 795 (अंबरनाथ-613,भिवंडी-3 हजार 061,कल्याण-484,मुरबाड-1 हजार 666 व शहापूर-2 हजार 971) घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे.यापैकी 5 हजार 086 लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी 1 हजार 594 घरकुले बांधकाम सुरु झाले असून 3 हजार 492 घरकुले तातडीने सुरु करण्यासाठी निर्देश दिले आहेत.

राज्य पुरस्कृत आवास योजनेअंतर्गत शबरी आदिवासी घरकुल योजना अंतर्गत 518 (अंबरनाथ-10,भिवंडी-79,कल्याण-10,मुरबाड-234 व शहापूर-185) घरकुले तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे रमाई आवास योजनेअंतर्गत 91 (अंबरनाथ-3,भिवंडी-3,कल्याण-4, मुरबाड-68 व शहापूर-13) घरकुले तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. असे एकूण जिल्हयामध्ये 16 हजार 903 घरकुल लाभार्थ्यांचा भूमीपूजन कार्यक्रम दि. 27 मार्च,2025 रोजी ग्रामपंचायत स्तरावर संपन्न होणार असून सर्व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत आवाहान करण्यात येत आहे.



# बेकायदा बॅनरबाजीवर महापालिकेची टाच

## उल्हासनगरात १३ गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** कोणत्याही ठिकाणी बेकायदा पद्धतीने लावले जाणारे जाहिरात फलक, होर्डींग याविरूद्ध उल्हासनगर महापालिका प्रशासनाने आक्रमक भूमिका घेत अशी बॅनरबाजी करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्यास सुरूवात केली आहे. गेल्या काही दिवसात उल्हासनगर महापालिकेने केलेल्या कारवाईत १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती उल्हासनगर महापालिका प्रशासनाने दिली आहे.

शहरात कोणत्याही ठिकाणी बेकायदा जाहिरात फलक, होर्डींग, प्रदर्शित होणार नाहीत यादृष्टीने उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये आदेश दिलेले आहेत. हा आदेश शहरातील नागरिकांच्या तसेच सर्व राजकीय पक्षांच्या निदर्शनास यापूर्वी वेळोवेळी आणून दिलेले आहेत. त्यानंतरही उल्हासनगर शहरात ठिकठिकाणी राजकीय व्यक्ती, कंपन्या आणि इतर जाहिरातींचे फलक प्रदर्शित होत असल्याचे पालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

त्यामुळे उल्हासनगर महापालिका प्रशासनाने प्रभाग समितीच्या सहायक आयुक्तांना अशा फलकबाजीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर उल्हासनगर महापालिकेच्या प्रभाग समिती अधिकाऱ्यांनी आपापल्या प्रभागात कारवाई केली होती. त्यानंतर प्रभाग समिती १ ते ४ कार्यालयाच्या अखत्यारितील विविध ठिकाणी १३ गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकानुसार दिली आहे.

# उद्धव ठाकरे आधुनिक काळातील औरंगजेब-नरेश म्हस्के यांचा घणाघात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विधीमंडळाचं कामकाज संपल्यानंतरही औरंगजेबाच्या नावावरून राजकारण तापलंय. कुणाल कामराच्या विडंबन काव्यावरून उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना खासदार नरेश म्हस्के यांनी उद्धव ठाकरेंची तुलना थेट औरंगजेबशी केली आहे. उद्धव ठाकरे हे 'आधुनिक औरंगजेब' असल्याची टीका खासदार म्हस्के यांनी केली आहे. यामुळे आता पुन्हा एकदा उद्धव ठाकरे शिवसेना आणि शिंदे गट शिवसेना आमनेसामने आली आहे.

पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरेंनी कामरा काही चुकीचं बोलला नाही, असं म्हणत त्यांनी त्याला पाठिंबा दिला. अधिवेशनातही त्यांनी देशाला उत्तम गाणे मिळाले आहे, असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना



टोला लगावला होता. यावर शिंदे गटाकडून जहरी प्रतिक्रिया देण्यात आलीय. औरंगजेबने ज्याप्रमाणे आपल्या वडिलांना आणि भावांना त्रास दिला होता, तसाच त्रास उद्धव ठाकरेंनी दिलाय. स्वत: राज ठाकरे यांनी याबाबत वक्तव्य केलंय. बाळासाहेब ठाकरे यांच्या अखेरच्या दिवसात उद्धव ठाकरेंनी त्यांना खूप त्रास दिला होता.

प्रॉपर्टीसाठीही त्यांनी त्यांच्या भावाला त्रास दिला. प्रॉपर्टीचा वाद त्यांनी कोर्टात नेला होता. आपल्या सख्ख्या भावांना त्यांनी पद्धतशीरपणे दूर केलं. उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांचा वैचारिक वारसा घेतला नाही. पण वडिलांची संपत्ती घेतली. बाळासाहेबांच्या निधनानंतरही ते त्यांच्या वडिलांना त्रास देत आहेत. शिवसेनेच्या विचारधारेचे शत्रू असलेल्यांशी त्यांनी हातमिळवणी केलीय. जे भावाचे नाही झाले नाहीत, ते जनतेचे काय होणार? असा टोला नरेश म्हस्के यांनी लगावला.

# उन्हाळी प्रवासासाठी लाल परी सज्ज ठाणे विभागाचे विशेष नियोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** उन्हाळी हंगामा करीता एसटीचा ठाणे विभाग सज्ज असल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाने दिलेली असून १५ एप्रिल ते १५ जुन या दरम्यान प्रवाशांकरिता जादा फेऱ्यांचे नियोजन एसटी विभागामार्फत करण्यात आलेले आहे.सदर फेऱ्या आरक्षणासाठीही उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे वाहतूक विभागाने स्पष्ट केले आहे.

ठाण्याहुन कोल्हापूर , मायणी , चोपडा, नारायणगाव, सोलापूर , आटपाडी, भिवंडी वरून शेवगाव, अहमदपूर, चिपळूण ,आष्टी,.. शहापुर वरुन चोपडा ,साक्री ,.कल्याणहून बामनोली, लोणार, वडूज, धुळे, जामखेड.तसेच मुरबाड वरुन शिरूर



(व्हाया लोणी) शिरूर (व्हाया जांबृत ),शिरूर (व्हाया बेल्हा) , बदलापूर घोट तसेच विठ्ठलवाडी वरून गुहागर, दापोली, भीमाशंकर या मार्गावर जादा फेऱ्यांचे नियोजन ठाणे विभागाने केले आहे .

त्याचप्रमाणे वंदना स्थानकातुन सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत दर एक तासांनी साताऱ्या करिता एसटी उपलब्ध करण्यात आली आहे .तसेच दर अर्ध्या तासाने ठाणे स्वारगेट या मार्गावर ई शिवनेरी धावणार आहे.

एसटी सार्वजनिक वाहतुकीचा कणा आहे.प्रवाशांची खाजगी मालकांकडून या गर्दीच्या हंगामात होणारी लुट थांबावी या करिता एसटी ने शालेय विद्यार्थ्यांच्या परिक्षा संपताच , लग्नसराई तसेच पर्यटनास बाहेर पडणाऱ्या प्रवाशांचा विचार करून उन्हाळी हंगामाचे तातडीने नियोजन केले आहे याचा जास्तीत जास्त प्रवाशांनी या नियोजनाची नोंद व सेवेचा लाभ घ्यावा असे एसटी वाहतूक विभागाच्यावतीने कळवण्यात आले आहे.

प्रवाशांच्या सेवेसाठी एसटी विभागाच्या ब्रीदवाक्यानुसार उन्हाळी हंगामात एसटी फेऱ्यांचे प्रवाशांसाठी केलेले नियोजन याबाबत प्रवाशांनी समाधान व्यक्त करीत आहेत.

# आयुक्तांच्या मध्यस्थीने सुटला गणगौर उत्सवाचा वाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये गेल्या सात ते आठ वर्षापासून राजस्थानी समाजामार्फत गणगौर उत्सव मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरा केला जातो या सणानिमित्ताने भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटींवर महानगरपालिका सुरक्षिततेच्या उपाययोजना करीत असते परंतु उत्सवासाठी दोन्ही संस्थां कडून एकाच वेळेला परवानगी मागितली जात असल्यासकारणाने कार्यक्रमाच्या परवानगी व ठिकाणासंदर्भात नेहमीच वाद होत असत त्या संदर्भात माननीय न्यायालयात दावे देखील दाखल झाले होते त्यामुळे महापालिका व सुरक्षा यंत्रणावर याचे परिणाम होत असत गणगौर उत्सवाची डोकेदुखी ही सर्वांसाठी ठरली होती. त्यावर महापालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबीनोद शर्मा (भा. प्रो.से.) यांनी मध्यस्थी करून एक चांगला तोडगा काढीत हा वाद कायमचा सोडवला आहे.

याबाबत महापालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी परिपत्रका द्वारे माहिती देताना सांगितले की, गेल्या आठ वर्षापासून राजस्थानी जनजागरण सेवा संस्था व श्री सप्तेश्वर सालासार हनुमान मंदिर मे सर्वेश्वर चारिटेबल ट्रस्ट या दोन्हीही संस्थांमध्ये गणगौर उत्सवाच्या पार्श्वभूमीवर परवानगी व ठिकाणाबाबत वाद निर्माण झाला होता आणि या संदर्भात माननीय न्यायालयात ही दावे दाखल करण्यात



आले होते त्यामुळे दोन्ही संस्थांची एकत्रित बैठक घेऊन कार्यक्रमाची पार्श्वभूमी मागील कार्यक्रमाबाबतचे अंतिम निर्णय माननीय उच्च न्यायालयाचे आदेशातील वस्तुस्थिती नुसार सदर प्रकरणी अंतिम अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार हे महापालिका आयुक्तांचे असल्याचे एकत्रितपणे घेतलेल्या बैठकीत सांगितल्याप्रमाणे महापालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबीनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी सदर बैठकीमध्ये दोन्ही संस्था या एकाच समाजातील असून सामाजिक कार्य करीत असल्याने आपल्या संस्थांच्या अर्जाप्रमाणे दोघांनाही एकत्रितपणे कार्यक्रम, उत्सव साजरा करण्याच्या सूचना देऊन महत्त्वाची मध्यस्थी केल्याने गणगौर उत्सवासाठी परवानगी देऊन या कार्यक्रमास संदर्भातील वादावर कायमचा पडदा पाडला. त्यामुळे 27 मार्च ते 21 मार्च पर्यंत साजरा केला जाणारा गणगौर उत्सव हा अत्यंत समाधान,आनंद व उत्साहात पार पडणार असल्याने राजस्थानी समाजातून आयुक्तांच्या महत्त्वाच्या मध्यस्थी व निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

# आदिवासी विभागात कोट्यवधींचा गणवेश खरेदी घोटाळा

## उपमुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आदिवासी विभागातील 114 कोटींच्या गणवेश खरेदीत भ्रष्टाचार प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. विधान परिषदेत सदस्य एकनाथ खडसे आणि चंद्रकांत रघुवंशी यांनी विधान परिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना गणवेश खरेदीत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला होता तसेच आरोग्य, आदिवासी, परिवहन, पीडब्ल्यूडी विभागात सुरू असलेल्या भ्रष्टाचारावरून सरकारला जाब विचारला.

ते म्हणाले, आदिवासी विकास विभागात मागील महिन्यात 114 कोटींचे गणवेश खरेदी झाली. ही सगळी खरेदी आवश्यक नसताना झाली. एक कोटीपेक्षा अधिक रकमेची खरेदी दर करारावर न करता रीतसर निविदा प्रक्रिया राबवूनच केली जावी. या सरकारच्या आदेशाला फाटा देत आदिवासी विकास विभागाच्या वतीने तब्बल 114 कोटींची गणवेश आणि नाइट ड्रेस खरेदी दर करारावर करण्यात आले. इतकेच नव्हे तर त्यातील सुमारे 72 कोटींची देयके पुरवठादार संस्थेला अदाही करण्यात आली. या खरेदीतील भ्रष्टाचारप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी खडसे यांनी केली.

# पार्किंग धोरणासाठी ठाण्यात पुन्हा सर्वेक्षण

## रस्त्यांची वर्गवारी निश्चित केली जाणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेल्या काही वर्षांपासून कागदावर असलेले पार्किंग धोरण प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाने जोरदार हाचाली सुरू केल्या असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शहरातील रस्त्यांचे सर्वेक्षण करून त्याची वर्गवारी पुन्हा निश्चित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यामुळे पार्किंग धोरणाची लवकरच अंमलबजावणी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात वाहनतळाची पुरेशी सुविधा उपलब्ध नाही. यामुळे नागरिक रस्त्यावर बेकायदा वाहने उभी करतात. अशा वाहन पार्किंगमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन कोंडी होते. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊ नये आणि नागरिकांना वाहनतळाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी पालिका प्रशासनाने काही वर्षांपुर्वी पार्किंग धोरण आखले होते. त्याचा सविस्तर आराखडा तयार केला होता. या आराखड्यानुसार शहरातील रस्त्यांलगत पार्किंग क्षेत्र निश्चित करून त्याठिकाणी शुल्क आकारण्यात येणार होते. यातून पालिकेने उत्पन्न मिळणार होते.

यासाठी पालिकेने शहरातील रस्त्यांचे सर्वेक्षण करून पार्किंग क्षेत्र निश्चित करण्यात आले होते. यानुसार शहरातील १६८ रस्त्यांवर ११ हजार ९३१ वाहने उभी करण्याची सुविधा उपलब्ध होणार होती. त्यामध्ये ६४७७ दुचाकी, १५४६ तीनचाकी, ३३६० हलकी चारचाकी, ५४८ अवजड चारचाकी वाहनांचा समावेश होता. या पार्किंगसाठी अ, ब, क, ड अशी रस्त्यांची वर्गवारी करून त्याप्रमाणे वाहन पार्किंग शुल्काचे दर निश्चित केले होते. या संबंधीच्या प्रस्तावास सर्वसाधरण सभेनेही मान्यता दिली होती. परंतु करोना काळ आणि काही तांत्रिक अडचणींमुळे पार्किंग धोरणाची अंमलबजावणी होऊ शकली नव्हती.

गेल्या काही वर्षांपासून कागदावर असलेले पार्किंग धोरण प्रत्यक्षात उतरविण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाने जोरदार हाचाली सुरू केल्या असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शहरातील रस्त्यांचे सर्वेक्षण करून त्याची वर्गवारी पुन्हा निश्चित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. गेल्या काही वर्षात वाहनांच्या संख्येत वाढ झाली असून नवीन रस्त्यांची निर्मिती झाली आहे. काही रस्त्यांवर कोंडी होत आहे. त्यामुळे सद्यस्थितीचा पाहाणी करण्यासाठी पालिकेने पुन्हा सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पार्किंग धोरणाची लवकरच अंमलबजावणी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

# वाढत्या कॉँक्रीटीकरणामुळे भूगर्भातील पाणी पातळीत घट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** वाढत्या कॉँक्रीटीकरणामुळे भूजलगर्भातील पाणी पातळी कमी झाली आहे. त्यामुळे उरण परिसरातील अनेक हात पंपाचे पाणी गायब होऊ लागले आहे. भूगर्भातील घटती पाणी पातळी ही चिंतेची ठरू शकते. उरण हा सर्वात वेगाने विकसित होत असलेला परिसर आहे. येथील विविध प्रकल्प आणि औद्योगिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात सिमेंटचे कॉँक्रीटीकरण सुरू आहे. यात प्रकल्प आणि रहिवाशी इमारती ही वाढू लागल्या आहेत. यात जमिनीवर कॉँक्रीटीकरण केले जात आहे. तर याच विभागात शहर,गाव आणि उद्योग परिसराला जोडणाऱ्या रस्ते मार्गाच्या कॉँक्रीटीकरण केले जात आहे. या कॉँक्रीटीकरणामुळे पावसाळ्यातील भूगर्भात मुरत असलेले पाणी पुरेसे मुरत नसल्याने या भूगर्भातील पाणी पातळी घटू लागली आहे.

उरणमध्ये दरवर्षी अडीच ते तीन हजार मिलिमीटर पावसाची नोंद होते. यातील बहुतेक पाणी समुद्रात वाहून जात आहे. परिणामी येथील नागरिकांना उन्हाळ्यात प्रचंड पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. या विकसित परिसरात ही टँकरने पाणी पुरवठा करण्याची वेळ आली आहे. या वाढत्या सिमेंट कॉँक्रीटीकरणामुळे शेतीवरही परिणाम होऊ लागला आहे. उरण मधील अनेक रहिवासी वस्त्या तसेच व्यवसाय आणि फार्म हाऊस आदी ठिकाणी भूगर्भातील पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र यातील अनेक हात पंपांचे पाणी कमी किंवा बंद झाले असल्याची माहिती करंजा येथील नागरिक मार्तंड नाखवा यांनी दिली आहे. दरम्यान, भूगर्भातील पाणी पातळी कमी झाल्याने समुद्राची पातळी वाढू लागली आहे. त्यामुळे रिकाम्या झालेल्या भूगर्भात समुद्राचे खारे पाणी येऊ लागले असून बोअरवेलमध्ये समुद्राच्या खाऱ्या पाण्याचा शिरकाव होऊ लागला आहे.

# ठाण्यातील १२९ थकबाकीदारांचे पाणी बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये उत्पन्न वसुलीचे दिलेले उद्दीष्ट गाठण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने थकबाकीदारांवर कारवाईचा बडगा उगारला असून बुधवारी दिवसभरात पाणी पुरवठा विभागाने १२९ थकबाकीदारांच्या नळजोडण्या तोडून पाणी पुरवठा खंडीत केला आहे. तसेच दिवसभरात दोन कोटी रुपयांहून अधिक देयकांची वसुली केली आहे. ठाणे महापालिकेच्या २०२४-२५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा विभागाला २२५ कोटी रुपयांच्या उत्पन्न वसुलीचे उद्दीष्ट आखून देण्यात आले होते. हे उद्दीष्ट गाठण्यासाठी पाणी पुरवठा विभागाकडून गेल्या काही महिन्यांपासुन प्रयत्न करण्यात येत असून आतापर्यंत १३६ कोटी रुपयांची वसुली करण्यात पाणी पुरवठा विभागाला यश आले आहे. ही वसुली गेल्यावर्षीच्या याच काळातील वसुलीपेक्षा १३ कोटी रुपयांनी अधिक असल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे.

# गिग व प्लॅटफॉर्म कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने (Ministry of Labour & Employment) गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून दिलेली असून नोंदणी करून घेण्यासाठी पात्र गिग कामगारांनी http://register.eshram.gov.in/#/user/platform-worker-regitration, या अधिकृत लिंकवर जाऊन त्वरित नोंदणी करावी, असे आवाहन सहायक कामगार आयुक्त कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत प्लॅटफॉर्म इकोनॉमी भारतात आणि जागतिक स्तरावर रोजगार निर्मितीचे एक मोठे साधन बनले आहे. लाखो गिग कामगार या क्षेत्रात कार्यरत आहेत आणि त्यामुळे त्यांना सुरक्षित भविष्यासाठी सरकारी योजनांचा लाभ मिळावा म्हणून केंद्र शासनामार्फत गिग कामगारांच्या नोंदणीचा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.

ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केलेल्या गिग कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे ओला, उबेर, रॅपिडो, झोमॅटो, स्विगी, झेपटो, ब्लिंकीट, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मिशो, अरबन क्लॅप यासारख्या प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या डिलिव्हरी बॉय, राइडर, ड्रायव्हर आणि इतर गिग कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## संक्षिप्त

# ठाणे महसूल विभागातील नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी जिल्हा नियोजन भवन समिती सभागृहामध्ये आज पायाभूत प्रशिक्षण पार पडले.

यावेळी प्र.अपर जिल्हाधिकारी विकास गजरे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, तहसिलदार रेवण लेंभे, सचिन चौधर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांमधील कर्मचारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणाद्वारे सहाय्यक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, महसूल सहायक आणि ग्राम महसूल अधिकारी या पदांवरील कर्मचाऱ्यांसह कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांना रजा नियम, शिस्त व अपील, टिपणी व पत्रलेखन, सहा गठ्ठा पद्धती, ई-ऑफिस, IGOT, आर्थिक व्यवस्थापन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांनी सहा गठ्ठा पद्धती, उपअधिदान व लेखा अधिकारी भानुदास जठार, लेखाधिकारी अश्विनी सुर्वे व अश्लेषा जाधव यांनी रजा नियम, शिस्त व अपील, टिपणी व पत्रलेखन या विषयीचे मार्गदर्शन केले. तसेच ई-ऑफिस प्रणालीचे जिल्हा समन्वयक कृष्णा उथळे, विभागीय आयुक्त कार्यालयातील ई-ऑफिस प्रणालीच्या समन्वयक स्वाती सानप यांनी ई-ऑफिस प्रणालीबाबत मार्गदर्शन केले. सी-डॅक प्रगत संगणन विकास केंद्राचे सहसंचालक प्रकाश पिंपळे यांनी IGOT, कृत्रिम बुद्धिमत्ता याविषयावर तर आर्थिक व्यवस्थापनाविषयी एलएमएन फायनॅन्शियल सर्व्हिसेसचे संचालक लॉईड रेगो यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी जनसंपर्क, जिल्हा माहिती कार्यालयाचे कामकाज आणि दैनंदिन कामकाजातील आनंद व सकारात्मकता, कर्मचाऱ्यांचा आपापसातील समन्वय याबाबत प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणात सहाय्यक महसूल अधिकारी - 52 कर्मचारी, मंडळ अधिकारी – 5 कर्मचारी, महसूल सहायक - 51 कर्मचारी, ग्राम महसूल अधिकारी (नवनियुक्त) - 69 कर्मचारी असे मिळून 177 कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

# जिंदाल स्टेनलेस महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटींची गुंतवणूक करणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जिंदाल स्टेनलेस लिमिटेड महाराष्ट्रात ४२ हजार ८८६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा प्रकल्प उभा करणार आहे. यातून सुमारे साडे पंधरा हजार रोजगार संधी उपलब्ध होणार असल्याने, या प्रकल्पाचे महाराष्ट्रात स्वागत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिंदाल स्टेनलेस लिमिटेडचे अध्यक्ष रतन जिंदाल यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची ‘सागर’ या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत श्री. जिंदाल यांनी या प्रकल्पाच्या उभारणीचा प्रस्ताव सादर केला. या प्रकल्पाची उत्पादन क्षमता वार्षिक चार दशलक्ष टन इतकी असणार आहे.

या उद्योग समुहाने आणि श्री. जिंदाल यांनी महाराष्ट्राच्या क्षमतेवर दाखविलेला विश्वास महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रकल्पाकरिता सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत नमूद केले.

याप्रसंगी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन, जिंदाल समुहाचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.




# १६ आणि १९ वर्षांखालील क्रिकेटपटूंसाठी मोफत निवड चाचणी

## मुंबई चॅम्पियनशिप टी-ट्वेंटी डे नाईट क्रिकेट टुर्नामेंट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुंबई चॅम्पियनशिप टी-ट्वेंटी डे नाईट क्रिकेट टुर्नामेंटसाठी १६ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेटपटूंसाठी मोफत निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन शनिवार, २९ मार्च रोजी बेडेकर कॉलेज परिसर, ठाणे पश्चिम येथे करण्यात आले आहे. या चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना मुंबईच्या प्रीमियर डे-नाईटमध्ये क्रिकेट टुर्नामेंट त्यांचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल. मुंबईची हि पहिलीच दिवस आणि रात्र क्रिकेट स्पर्धा आहे. या निवड चाचणीसाठी ड्रेस कोड निळा टी-शर्ट आणि काळा ट्रॅक पँट असून अधिक माहितीसाठी संपर्क: ८६९३०८५५५५

# नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ठाणे जिल्ह्याचे यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उद्देशाने भारत सरकारच्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात जवाहर नवोदय विद्यालय सुरु करण्यात आली आहेत. या विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सी. बी. एस. सी. ई पॅटर्न च्या धर्तीवर बारावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. तर संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या ३० जागांपैकी शहापूर तालुक्यातील – २१ पात्र विद्यार्थी, मुरबाड तालुक्यातील – ०१ पात्र विद्यार्थी, भिवंडी तालुक्यातील- ०१ पात्र विद्यार्थी असे एकूण - २३ पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ३० जागांपैकी २३ जागेवर पात्र विद्यार्थ्यांची निवड झाली आणि शहापूर तालुक्यातील २१ विद्यार्थ्यांची निवड झाली ही आनंदाची बाब आहे. या सर्व विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी दिल्या आहेत.

ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी नवोदय विद्यालयात इयत्ता ६ वी च्या एकूण ८० जागा आहेत. त्यापैकी ६० जागा ग्रामीण भागासाठी व २० जागा शहरी भागासाठी असतात. यात ठाणे जिल्ह्यासाठी ग्रामीण भागासाठी ३० जागा व शहरी भागासाठी १० जागा राखीव असतात. संपूर्ण ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ३० जागांपैकी २३ पात्र विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी (शिक्षण), गटशिक्षाधिकारी या सर्वांना शिक्षण विभागाच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्मितीसाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध

## -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्ह्यामध्ये औद्योगिक धोरण राबविताना विविध ठिकाणांवरून येणाऱ्या गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी, याकरिता सामूहिक प्रयत्न करण्यात येतील. यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे केले.

“मिशन 100 डेज्” अंतर्गत गुंतवणूक प्रचार-प्रसार आणि प्रोत्साहन समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृह येथे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

शासनाने क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा 7 कलमी कृती आराखडा निश्चित करून त्याची प्रभावी कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. शासन निर्णयातील 7 कलमी कृती आराखड्यामध्ये “गुंतवणूकीस प्रोत्साहन” अंतर्गत गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि गुंतवणूक वाढावी याकरिता सामूहिक प्रयत्न करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी फेडरेशन ऑफ इंडस्ट्रिज ऑफ इंडियाचे अध्यक्ष भालचंद्र रावराणे, रवींद्र सावंत, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा कृषी अधीक्षक रामेश्वर पाचे, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी राजेंद्र हिवाळे, आदिवासी विकास प्रकल्प सहाय्यक प्रकल्प अधिकारी पूजा हिप्परगेकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी सुनील भुताळे, एमएमआरडीएचे वरिष्ठ रचनाकार अमित सावंत, रचनाकार तृप्ती राणे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार, कार्यकारी अभियंता श्री.कांबळे, उपकार्यकारी अभियंता जगदीश सोनार, ठाणे ग्रामीण पोलीस उप अधीक्षक प्रमोद बाबर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे, व्यवस्थापक अश्विनी कोकाटे, महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री.पिरवानी, नवी मुंबई विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि इतर विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचित केले की, व्यापारी वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करावा. गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्था या बाबींची प्रभावीपणे हाताळणी करावी. कौशल्य प्रशिक्षणाच्या गरजांची तपासणी करावी. तसेच क्षेत्रानुसार कौशल्य प्रशिक्षण देण्यात यावे. कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उद्योग प्रशिक्षण केंद्र उपलब्ध होईल हे पाहावे.

प्रास्ताविकात उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ यांनी जिल्हा उद्योग केंद्राच्या सर्व योजना व कार्यक्रम (PSI, CMEGP, ODOP, निर्यात प्रोत्साहन कार्यक्रम, Ignite कार्यक्रम), निर्यात परिषद - महाराष्ट्र राज्याच्या निर्यातीची माहिती (ठाणे जिल्ह्यातून 52 हजार कोटी रुपयांची निर्यात), शासनाचा 7 कलमी कृती आराखडा, सामंजस्य करारातील गुंतवणूक आणि त्याचा पाठपुरावा, 95% सामंजस्य करार अंमलबजावणीच्या टप्प्यात, प्रादेशिक गुंतवणूक शिखर बैठक, एमएसएमई क्षेत्रावर लक्ष केंद्रित असून त्याकरिता 4 हजार 700 कोटी रुपयांची गुंतवणूकीचे उद्दिष्ट, 22 निर्यात प्रोत्साहन परिषदा (उदा. FIEO), जिल्हा वेबसाईटवर निर्यात डॅशबोर्ड आदी विषयांबाबत माहिती दिली.

# कर्नाळा अभयारण्यात लोखंडी पत्रे चोरताना टेम्पो पकडला

## चोरांनी अंधाराचा फायदा घेऊन पळ काढला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : अनेक वर्षांच्या लढ्यानंतर मुंबई गोवा महामार्गाचे उत्कृष्ठ दर्जाचे काम सुरू आहे, मात्र सध्या याच महामार्गावर चोरांचा सुळसुळाट आहे. गुरुवार 27 मार्च च्या रात्री 2 च्या सुमारास कर्नाळा अभयअरण्य येथे प्राण्यांच्या संरक्षणासाठी लावलेल्या लोखंडी पत्रे बॉक्स चोरताना व ते पळवून नेताना लोखंडी बॉक्सने भरलेला टेम्पो जागृत वाहन चालकांनी पकडला आहे. यावेळी झालेल्या झटापटीत मात्र सदर आरोपी जंगलातील दाट अंधाराचा फायदा घेत संरक्षण भिंतीवरून उडी मारून जंगलात पळाले आहेत.



सविस्तर घटना अशी की, मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा अभयअरण्य येथे माकडं व इतर प्राणी रस्त्यावर येऊ नये म्हणून सदर प्राण्यांच्या संरक्षणासाठी उंच लोखंडी पत्रे बॉक्स लावण्यात आले आहेत. आणि त्या पत्र्यांमुळे अनेक प्राण्यांचे सरंक्षणही होत आहे. मात्र गुरुवारी 27 मार्चच्या मध्यरात्री 2 च्या सुमारास मुंबई हुन पेण च्या दिशेने काही तरुण जात असताना MH 46 BM 0474 क्रमांकाच्या टेम्पो मध्ये सदर लोखंडी पत्रे बॉक्स चोरत असल्याने निदर्शनास आले. यावेळी सदर जागृत तरुण गाडी थांबवून पत्रे का चोरता हे विचारायला गेल्यावर आणि तात्काळ पनवेल पोलिसांना मोबाईल वरून संपर्क करत असताना झालेल्या झटापटीत टेम्पो मधील 3 जणांनी हाताला झटका देत व दाट अंधाराचा फायदा घेत संरक्षण भिंतीवरून उडी मारून जंगलाच्या दिशेने पसार झाले.

त्यानंतर सदर तरुणांनी 100 नंबर संपर्क करून सदर घटनेची माहिती दिली असता काही वेळाने निर्भया पथकाचे पोलीस कर्मचारी शिल्पा कवी व धनंजय पाठारे घटनास्थळी दाखल झाले असता सदर चोरीतील लोखंडी बॉक्सने भरलेला टेम्पो, चावी व मोबाईल रात्री 3.30 वाजता पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. चोरीतील तिन्ही आरोपी जरी फरार असले तरी लोखंडी पत्र्यांनी भरलेला टेम्पो मात्र पोलिसांच्या ताब्यात आहे. सदर कर्नाळा अभयअरण्यातील प्राण्यांच्या सरंक्षणासाठी लावण्यात आलेल्या शेकडो लोखंडी पत्रे बॉक्स चोरीला गेल्याचे दिसत आहे.

# एसटी महामंडळाकडून उन्हाळी गर्दीच्या हंगामासाठी जादा वाहतूक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : उन्हाळयाच्या सुट्टींमध्ये प्रवाशांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत दरवर्षीप्रमाणे जादा वाहतूक करण्यात येणार आहे. यंदा देखील उन्हाळी जादा वाहतूकीसाठी दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून या सर्व फेऱ्या आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. दर वर्षी उन्हाळयाच्या सुट्टीत १५ एप्रिल,२०२५ ते दिनांक १५ जून,२०२५ पर्यंत एसटी मार्फत नियोजित फेऱ्या व्यतिरिक्त जादा वाहतूक केली जाते. स्थानिक पातळीवर शटल सेवा आणि जवळच्या फेऱ्या संबंधित आगारातून चालवल्या जातात. परंतु उन्हाळी सुट्टीमुळे परगावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी लांब पल्ल्याच्या बसेस ची मागणी वाढते. त्यासाठी या काळामध्ये शालेय फेऱ्या रद्द करून , त्या ऐवजी लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू केल्या जातात.

उन्हाळी हंगाम कालावधीत विभागांकडून प्रवाशी गर्दी होणाऱ्या मार्गावर १५ एप्रिल,२०२५ पासून जादा फेऱ्या टप्पाटप्प्याने सुरु करण्यात येणार आहेत. उन्हाळी हंगामासाठी एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयमार्फत राज्यातील विविध मार्गावरील ७६४ जादा फेऱ्यांना मंजूरी देण्यात आली असून, या जादा फेऱ्यांव्दारे दैनंदिन ५२१ नियतांव्दारे २.५० लाख किमी चालविण्यात येणार आहे.

उन्हाळी जादा फेऱ्या संगणकीय आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तरी, प्रवाशांच्या सोयीसाठी रा.प.महामंडळाच्या अधिकृत वेबसाईट www.msrtc.maharashtra.gov.in वर तसेचnpublic.msrtcors.com* या संकेत स्थळावर व मोबाईल ॲपव्दारे या बरोबरच रा.प.महामंडळाच्या बसस्थानकांवरील आरक्षण केंद्रावर आगाऊ आरक्षण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तरी प्रवाशांना उन्हाळयाच्या सुट्टीतील प्रवासाचे नियोजन करून महामंडळाच्या मार्फत जादा वाहतूक सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन रा.प.महामंडळाव्दारे करण्यात येत आहे.

# सण, उत्सवात कायद्याचे पालन करा

## – आदिती तटकरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि गुढी पाडवा व रमजान ईद हे सण, उत्सव कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे करण्यासाठी सर्वांनी जिल्हा प्रशासनासह पोलिस यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. तसेच या कालावधीत जिल्हा पोलिसांची सोशल मीडियवर करडी नजर असून कुणीही सामाजिक एकता व सलोखा तसेच शांतता भंग करणारा मजकूर प्रसारीत करू नये, असे आवाहनही कु.तटकरे यांनी केले.

रायगड जिल्हा प्रशासनाच्या मार्फत गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी, हनुमान जयंती, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त नियोजन भवन सभागृहात शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्यासह शांतता समिती सदस्य, सर्व उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते. आगामी सण व उत्सवाचा काळ लक्षात घेता जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावेत. सण-उत्सव साजरे करताना न्यायालयांच्या तसेच प्रशासनाच्या आदेशांचे पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. उत्सवाला कोणतेही गालबोट लागणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. सण उत्सव आणि सलग आलेल्या सुट्ट्या पाहता पर्यटक मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेता जिल्ह्यातील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी बायपास मार्ग काढणे तसेच पर्यायी रस्ते कसे विकसीत करता येईल, याबाबत नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.तसेच या कालावधीत रुग्णवाहीका तैनात ठेवाव्यात. याबरोबरच फायर ब्रिगेडच्या गाड्या देखील सुसज्ज ठेवाव्या. अनेकदा मिरवणूक मार्गांवर अंधार असतो त्या ठिकाणी हॅलोजन ची व्यवस्था करावी. तसेच याकाळात वीज पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी असे निर्देश कु.तटकरे यांनी दिले.

### सोशल मीडियावर करडी नजर

सण उत्सवा दरम्यान शांतता भंग करणारे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे अनुचित प्रकार होणार नाहीत. तसेच फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर व इतर सोशल मीडियावर तेढ निर्माण करणाऱ्या व खोट्या बातम्या प्रसारित करणारे व्हिडीओ किंवा पोस्ट प्रसारित करणाऱ्यांविरुध्द् रायगड जिल्हा पोलीस दलातील सायबर सेल मार्फत सोशल मीडियावर 24 तास विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. पोलिसांनी जिल्ह्यातील जातीय सलोखा कायम ठेवण्यासाठी सोशल मिडीयावरील घटनांचे विश्लेषण करण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. प्रक्षोभक पोस्ट करणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ कारवाई करावी अशा सूचना कु.तटकरे यांनी यावेळी दिल्या. सर्वांनी सामाजिक शांतता ही नैतिक व सामूहिक जबाबदारी मानून कार्यक्रम करावेत. तसेच पोलीस प्रशासनाने देखील ज्या मिरवणूक व कार्यक्रम यांना ज्या नियमाच्या आधारे परवानगी दिली आहे त्याची एक प्रत कार्यक्रमासाठी निमंत्रित यांना द्यावी. या कार्यक्रमात शांतता भंग होणार याची दक्षता घ्यावी असे निर्देश कु.तटकरे यांनी दिले.जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हे सर्व सण उत्सव उत्साहात व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सांगितले. या काळात जिल्ह्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यात येईल. तसेच ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो तेथे पुरेसे टँकर द्वारे पाणी पूरविण्यात येतील असेही सांगितले. तसचे सर्व सण, उत्सवाच्या काळात ड्रोन कॅमेऱ्याद्वारे विशेष पाहणी करण्यात येणार आहे.

# महाराष्ट्रात खाजगी प्लेसमेंट एजन्सींसाठी नवे नियम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्रातील खाजगी प्लेसमेंट एजन्सींवर नियंत्रण आणण्यासाठी आणि युवकांना फसवणुकीपासून संरक्षण मिळावे यासाठी महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 हे विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले असून, यामुळे राज्यातील नोकरी शोधणाऱ्या युवकांसाठी अधिक सुरक्षित आणि पारदर्शक प्रणाली तयार होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांच्या कारकिर्दीत युवकांच्या कौशल्य विकासासाठी, रोजगारासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विधानपरिषद सदस्यांनी महाराष्ट्र राज्यात रोजगार मेळाव्याची वाढलेली संख्या, त्याचा युवकांना होणार लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या संधी असे सर्व निर्णय दूरदर्शी व मार्गदर्शक ठरणार असल्याचे सांगितले. तसेच महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 आणण्याचा निर्णय सुद्धा ऐतिहासिक ठरेल असे विधानपरिषद सदस्यांनी नमूद केले. या विधेयकामुळे बनावट भरती प्रक्रियेतून होणारी बेरोजगारांची फसवणूक थांबवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून उमेदवारांचे रोजगारात्मक हित जोपासले जाईल.

या विधेयकाबाबत बोलताना मंत्री श्री लोढा म्हणाले, “माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांनी राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर प्रत्येक विभागाला 100 दिवसाचा कार्यक्रम तयार करण्यास सांगितले होते. कौशल्य विकास विभागाच्या 100 दिवस कार्यक्रमात सदर विधेयक असावे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि त्यानुसार आम्ही महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक 2025 सादर करत आहोत. या विधेयकामुळे तरुणांच्या हक्कांचे संरक्षण होईल आणि प्लेसमेंट एजन्सीवर सुद्धा अंकुश राहील. आता प्रत्येक प्लेसमेंट एजन्सी सरकारच्या नोंदणीकृत चौकटीत असेल, त्यामुळे पारदर्शकता येईल आणि युवकांचा विश्वासही वाढेल.”

राज्यातील युवकांना देशातील आणि परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, पादयोजन संस्थांना सहकार्य करून त्यांचा सहभाग वाढवणे, त्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणणे तसेच संस्थानाच्या गुणवत्तापूर्वक कामांना प्रोत्साहन देणे हे सदर विधेयकाचे उद्दिष्ट आहे.

### विधेयकातील ठळक बाबी

1. या आधी गुमास्ता परवान्याच्या आधारे एजन्सी सुरू करता येत होती, मात्र आता तसे करता येणार नाही. सर्व प्लेसमेंट एजन्सीजना शासनाच्या नोंदणी प्राधिकरणाकडे नोंदणी बंधनकारक असून, वैध नोंदणी प्रमाणपत्राशिवाय कार्य करता येणार नाही.
2. चुकीची माहिती, खोटी कागदपत्रे, फसवणूक, माहितीचा दुरुपयोग, नोकरी प्रदान करण्यास निष्फळ ठरणे किंवा नकार देणे, शासनाच्या नावाने लोकांना भटकावणे अशा बाबी समोर आल्यास नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले जाईल किंवा निलंबित केले जाईल.
3. नोंदणीशिवाय कामकाज करणाऱ्या संस्थांवर दंडात्मक कारवाई किंवा तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद देखील या विधेयकात आहेत.
4. सरकारने केवळ नियमनच नाही, तर रोजगार संधी वाढवण्यासाठीही पावले उचलली आहेत. नोंदणीकृत खाजगी प्लेसमेंट एजन्सींसोबत रोजगार मेळावे, करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यशाळा आणि सेमिनार यासारखे अनेक कार्यक्रम कौशल्य विकास विभागाद्वारे भविष्यात घेण्यात येतील.

विधेयकामुळे महाराष्ट्रात नोकरी शोधणाऱ्या युवकांना अधिक संरक्षित आणि पारदर्शक प्लेसमेंट सेवा उपलब्ध होणार असून, खाजगी प्लेसमेंट एजन्सीच्या अनियमित कारभारावर नियंत्रण येणार आहे.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024